| MHSN060010942022 | **म.सं.कौ.हिं.का.अर्ज : ४८/२०२२**<br>सौ. जियापरवीन नाजिर शेख<br>विरुध्द<br>श्री. नाजिर अन्वर शेख |
|---|---|

## निशाणी १७ खालील आदेश

१. प्रस्तुत अर्जाद्वारे जाबदार यांनी कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा २००५ च्या कलम २७ नुसार ज्युरिडिक्शनचा प्राथमिक मुददा काढून मूळ अर्ज व दरम्यानच्या पोटगीचा अर्ज निकाली काढणेकामी विनंती केली आहे.

२. जाबदारांच्या कथनांनुसार अर्जदार व जाबदार यांचे दरम्यान सन १९९२–९३ पासून पती–पत्नीचे नाते अस्तित्वात नाही. सन १९९२ पुर्वी पासून अर्जदार या जाबदार यांचा त्याग करुन तसेच जाबदारांचे घर सोडून त्यांचे माहेरी व अन्य ठिकाणी वेगळे राहत होत्या व आहेत. त्यानंतर पुष्कळ प्रयत्न करुन देखील अर्जदार यांनी जाबदार यांचेबरोबर संसार करणेचा प्रयत्न केलेला नाही. त्यामुळे जाबदार यांनी मुस्लीम कायदयाप्रमाणे अर्जदार यांना तलाक दिलेला असून कायमस्वरुपी लग्नबंधनातून सन १९९२–९३ सलीच मुक्त केलेले आहे. अर्जदार यांनी दिलेला तलाक मान्य केल्यामुळे जाबदार यांनी इद्दत व मेहरची रक्कम म्हणून अर्जदार यांना लग्नात घातलेले सर्व दागिने परत केले आहेत तसेच अर्जदार यांनी देखील सर्व रक्कम मिळाल्याचे मान्य व कबूल केले आहे. अशाप्रकारे अर्जदार हया सुमारे ३० वर्षापासून जाबदार यांचेपासून विभक्त राहत आहेत. त्यामुळे जाबदार यांनी अर्जदार यांचेवर कौटुंबिक हिंसाचार करण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. तसेच अर्जदार यांनी कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा २००५ च्या तरतुदीखाली मूळ अर्ज व दरम्यानच्या पोटगीचा अर्ज देखील दाखल केला आहे. कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा हा सन २००६ पासून अस्तित्वात आलेला असून त्यापूर्वीच्या तथाकथित घरगुती हिंसाचाराच्या बाबींना हा कायदा लागू होत नाही. तसेच सदर कायदा अस्तित्वात आला त्यावेळी अर्जदार व जाबदार यांचेमध्ये पती–पत्नीचे नाते अस्तित्वात नव्हते. त्यामुळे कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदयाच्या तरतुदीखाली दाखल केलेला मूळ अर्ज व

दरम्यानच्या पोटगीचा अर्ज कायदयाने चालणेस पात्र नाही. तसेच अर्जदार यांनी जाबदार हे त्यांना एप्रिल २०२२ अखेर रक्कम रु. ५,०००/– देत असल्याचे मान्य व कबूल केले आहे. तसेच जाबदार यांनी अर्जदार यांना फ्लॅट खरेदीसाठी भरघोस रक्कम देखील वेळोवेळी चेकने अदा केलेली आहे. यावरुन जाबदार यांनी त्यांची नैतिक जबाबदारी पार पाडल्याचे स्पष्ट दिसून येते. त्यामुळे जाबदार यांनी अर्जदारावर कौटुंबिक हिंसाचार केला आहे असे म्हणता येणार नाही. त्यामुळे ज्युरिडिक्शनचा प्राथमिक मुददा काढून टाकून मूळ अर्ज व दरम्यानच्या पोटगीचा अर्ज निकाली काढणेकामी त्यांनी विनंती केली आहे.

३. अर्जदार यांनी निशाणी १८ वर म्हणणे दाखल करुन अर्जास सक्त विरोध दर्शवून जाबदार यांचा अर्ज नामंजूर करणेची विनंती केली आहे. अर्जदार यांचे असे कथन आहे की, जाबदार यांचा नि.१७ कडील अर्ज प्रचलित कायदयाच्या तरतुदीप्रमाणे नाही. तसेच केवळ अर्जाचे काम थांबविणेसाठी व अर्जदार यांना खर्चात पाडणेसाठी जाबदार यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. तसेच कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा कलम २७ मधील तरतुदीनुसार अर्जदार या कायमपणे मे. कोर्टाचे अधिकार कक्षेतच राहत आहेत. त्यामुळे खोटी व काल्पनिक कथने करुन जाबदार यांनी प्राथमिक मुददा काढणेकामी केलेला अर्ज कायदयाने चालू शकत नाही. सबब, जाबदार यांचा प्रस्तुतचा अर्ज फेटाळयाची विनंती अर्जदार यांनी केली आहे.

४. जाबदार व अर्जदार यांचे वकीलांचा युक्तीवाद ऐकला. संपूर्ण संचाचे अवलोकन केल्यानंतर खालील विचाराधीन प्रश्न उपस्थित होतात. त्या विचाराधीन प्रश्नांसोबत मी माझे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे देत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | प्रस्तुतचे प्रकरण चालविण्याचा या न्यायालयास अधिकार आहे काय ? | होकारार्थी... |
| २. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे... |

## कारणमिमांसा

### मुददा क्र.१ बाबत –

५. जाबदार यांनी प्रस्तुतचा अर्ज या न्यायालयास अधिकारक्षेत्र नाही

याबाबत दाखल केलेला आहे. सदरहू अर्जाद्वारे जाबदाराचे वकीलांनी असा युक्तीवाद केला की, सन १९९२–९३ पासून अर्जदार व जाबदार हे विभक्त राहत आहेत. तसेच जाबदार व अर्जदार यांचेमध्ये दोन साक्षीदारांसमक्ष तलाक झालेला आहे. त्यामुळे मुस्लीम कायदयानुसार अर्जदार व जाबदार यांचे पती–पत्नीचे संबंध संपुष्टात आले आहेत. त्यामुळे अर्जदार हिला जाबदार विरुध्द कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा २००५ नुसार मागण्या मागता येणार नाहीत. तसेच त्यांनी पुढे युक्तीवाद केला की, सन १९९२–९३ मध्येच जाबदार व अर्जदार यांचा तलाक झालेला आहे. तसेच कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण हा कायदा सन २००५ पासून अस्तित्वात आला आहे. म्हणून तो कायदा पुर्वलक्षित नाही. म्हणून अर्जदार हिचा अर्ज चालू शकत नाही.

६. अर्जदाराच्या वकीलांनी युक्तीवाद केला की, अर्जदार ही न्यायालयाच्या कार्यक्षेत्रातच राहायला आहे. तसेच कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा कलम २७ चे तरतुदीनुसार सदरहू न्यायालयास प्रस्तुतचा अर्ज निकाली काढणेचा अधिकार आहे. त्यामुळे जाबदाराचा अर्ज फेटाळावा अशी त्यांनी विनंती केली.

७. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. प्रकरणाचे अवलोकन केले. अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. जाबदाराच्या कथनानुसार, सन १९९२–९३ मध्येच जाबदार व अर्जदार यांच्यामध्ये दोन साक्षीदारांसमक्ष तलाक झालेला आहे. त्यामुळे त्यांचे पती–पत्नीचे नाते संपुष्टात आलेले आहे. असे असताना अर्जदार यांना कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा २००५ अन्वये अर्ज करता येणार नाही. जाबदाराच्या म्हणण्यानुसार मागील ३० वर्षापासून जाबदार व अर्जदार हे वेगवेगळे राहत आहेत व त्यांच्यामध्ये तलाक झालेला आहे. त्यासंदर्भात जाबदार यांनी तलाक देतेवेळी हजर असलेले दोन साक्षीदारांचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहेत. जाबदाराचे असे म्हणणे आहे की, मुस्लीम कायदयानुसार जाबदार व अर्जदार यांचा तलाक झालेला आहे. त्यामुळे कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदयाच्या तरतुदी अर्जदाराला लागू होणार नाहीत. परंतु, अर्जदार यांनी जाबदार व तिचेमध्ये तलाक झाल्याची बाब नाकारलेली आहे. त्यामुळे जाबदार व अर्जदार यांचेमध्ये मुस्लीम कायदयानुसार तलाक झाला किंवा नाही हे सिध्द झालेले नाही किंवा तसा कुठलाही दस्ताऐवज न्यायालयासमक्ष आलेला

नाही. जाबदार यांनी दाखल केलेल्या दोन साक्षीदारांच्या प्रतिज्ञापत्रावरुन आज रोजी जाबदार व अर्जदार यांचेमध्ये तलाक झाला ही बाब सिध्द झाली असे म्हणता येणार नाही.

८. जाबदाराच्या वकीलांनी युक्तीवाद केला की, सन २००५ मध्ये सदरहू कायदा करणेत आला. त्यापुर्वीच सन १९९२–९३ मध्ये जाबदार व अर्जदार यांचा मुस्लीम कायदयाप्रमाणे तलाक झालेला आहे. त्यामुळे त्यांचे पती पत्नीचे संबंध संपुष्टात आलेले आहेत. तसेच त्यांनी पुढे युक्तीवाद केला की, पती–पत्नी म्हणून जाबदार व अर्जदार एकाच छताखाली नांदले नाहीत. त्यामुळे अर्जदार ही व्यथित व्यक्ती (Aggrieved person) या संज्ञेत बसत नाही.

९. त्याकरिता व्यथित व्यक्ती या व्याख्येची पाहणी केली असता त्यामध्ये "व्यथित व्यक्ती म्हणजे कोणतीही महिला जिचे सध्या किंवा पूर्वी उत्तरवादी बरोबर कौटुंबिक संबंध आहेत." अर्जदार व जाबदार यांना सन १९९२ मध्ये त्यांचा विवाह झाल्याचे मान्य आहे व त्यानंतर ते काही दिवस सोबत होते ही बाब देखील मान्य आहे. त्यामुळे अर्जदार हिचे जाबदार यांचेसोबत कौटुंबिक संबंध होते ही बाब प्रथमदर्शनी दिसून येते.

१०. तसेच मा. सर्वोच्च न्यायालय, दिल्ली यांनी दिलेल्या न्यायनिवाडयाची पाहणी केली. ***(2012) 3 Supreme Court Cases 183, V.D. Bhanot Vs. Savita Bhanot (SLP (Cri.) No. 3916 of 2010 decided on 07.02.2012*****.**

> *B. Protection of women from Domestic Violence Act, 2005 – S.12- Application-Maintainability-Retrospective effect off 2005 Act- Application under S.12 by a woman, who had shared a household in past but was no longer residing with her husband or who was subjected to any act of domestic violence prior to coming into force of the Act, held, maintainable.*

११. सदरहू न्यायनिवाडयामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा २००५ हा कायदा अमलात येण्यापूर्वी व्यथित

व्यक्ती ही जाबदार/उत्तरवादीसोबत राहत असेल आणि त्यानंतर ते सोबत राहत नसतील तरी, या कायदयाद्वारे तिचा अर्ज हा प्रतिपालनीय आहे. त्यावरुन कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा २००५ हा पुर्वलक्षित आहे असे म्हणता येईल.

**१२.** एकंदरीत सर्व बाजूंचा विचार करुन वर उल्लेख केल्याप्रमाणे अर्जदार ही "व्यधित व्यक्ती" या संज्ञेत मोडते. जरी अर्जदार व जाबदार यांचे लग्न सन १९९२ मध्ये झाले असले आणि त्यांचे म्हणण्यानुसार सन १९९४ पासून अर्जदार ही वेगळी राहत असली तरी कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा, २००५ या कायदयाअंतर्गत अर्जदार हिला दाद मागणेचा अधिकार राहील. तसेच कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा कलम २७ नुसार व्यधित व्यक्ती कायमस्वरुपी किंवा तात्पुरती राहत असेल किंवा तिचा व्यवसाय/नोकरी असेल त्याठिकाणी, तसेच उत्तरवादी राहत असेल किंवा त्याचा व्यवसाय/नोकरी असेल त्याठिकाणी, तसेच जेथे घटना घडली तेथील सक्षम न्यायालयात अर्जदार ही अर्ज दाखल करु शकते. प्रस्तुतच्या प्रकरणामध्ये अर्जदार ही मिरज येथील रहिवासी आहे. तसेच जाबदारांचा व्यवसाय सुध्दा मिरज येथे असल्याचे अर्जदार हिने कथन केले आहे. त्यामुळे या न्यायालयाला अर्जदाराचा कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा कलम १२ प्रमाणे अर्ज चालविणेचा अधिकार आहे. त्यामुळे मुददा क्र.१ चे उत्तर होकारार्थी देऊन मुददा क्र. २ चे अनुषंगाने मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. जाबदार यांचा अर्ज नामंजूर करणेत येतो.

Sd/--

**(नि. बा. चव्हाण)**

न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, मिरज

न्यायालय क्र.४

मिरज.

दिनांक : ०८/१२/२०२२

*****

**CERTIFICATE**

I affirm that the, contents of this P.D.F. file order are same word to word, as per the original order -

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Sou. A.C. Patil, (Grade-III) |
| Court | : | 4th Jt. Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C., Miraj |
| Date | : | 08/12/2022 |
| Order signed by the Presiding Officer | : | 09/12/2022 |
| Order uploaded on | : | 09/12/2022 |